सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in

क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि–३/गु.यादी/२०१२/2955

दिनांक : - 9 OCT 2012 २०१२

प्रति,

प्राचार्य/संचालक

____

____

____

(सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था)

विषय :— संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत...

संदर्भ :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/ एडीएम/गुणवत्ता यादी/२०१२/१५२७, दि. ०३ ऑक्टोबर २०१२.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक सत्र २०१२–१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्म,एम.ई. पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यांत येतील. व लवकरच या कार्यालयाचे वेबसाईटवर **(www.rdtenagpur.org.in)** शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मधील गुणवत्ता यादी पडताळणीचे वेळापत्रक जाहीर करण्यांत येईल. संस्थेचे प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असेल अशा सर्व एआरसी प्रमुखांकडून हिशोबासह धनाकर्ष गुणवत्ता याद्या तपासण्यापूर्वी जमा करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच त्यांच्या गुणवत्ता याद्या तपासण्यांत येईल याची नोंद घ्यावी. तसेच गुणवत्ता यादी पडताळणीचे वेळी सबंधित संस्थांनी आवश्यक असणारी स्टेशनरी (जसे—कॅलकुलेटर, स्टैपलर, स्टॅपलर पीन, फ्लॅग व स्टॅम्प पॅड सोबत आणावे)

संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१२/१६२५, दि. २०.०७.२०१२ अन्वये प्रवेशित होणा—या उमेदवारांच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत आपणास सुचना देण्यांत आलेल्या आहेत. त्यासंदर्भाने आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी **संस्था प्रमुखांनी तपासणी केल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र पडताळणीवेळी आणणे अनिवार्य आहे**. आपले संस्थेस देण्यांत आलेल्या संकेतांक व पासवर्डव्दारे ऑनलाईन पध्दतीने लॉगइन करून आपले संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पडताळणी करतांना तपासून घ्यावी. **गुणवत्ता यादीत फेरफार किंवा अनियमितता करणा—या संस्थांवर कडक कारवाई करून तसा अहवाल संचालनालयास कळविण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

संस्थेने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या शासनमान्य नियमावलीनुसार गुणवत्ता यादी पडताळणी करावी. प्रवेश नियमांचे उल्लंघन करून अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणा—या किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश अपलोड करणा—या संस्थांच्या गुणवत्ता याद्या पुर्न:पडताळणी करून संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. शासन नियमानुसार संचालनालयाव्दारे दंडात्मक कारवाईनंतर संस्थेच्या गुणवत्ता याद्या मंजूर करण्याबाबत नंतर संचालनालयास शिफारस करण्यांत येईल. या कार्यालयामार्फत संस्थेची

• गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत आढळून आलेल्या त्रुटी गुणवत्ता यादीतील क्रमांकाचा उल्लेख करून तसे पत्र प्रवेश नियंत्रण समितीला आणि विद्यापीठास कळविण्यांत येईल. या कार्यालयामार्फत गुणवत्ता यादी मंजूरीची शिफारस करतांना त्यामध्ये केवळ जात वैधतेची त्रुटी शिल्लक असतील तर अशाच गुणवत्ता याद्या मा. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा (पूर्व), मुंबई या कार्यालयाकडे शिफारस करण्यांत येतील. उर्वरित त्रुटया संस्था स्तरावर/सहसंचालक स्तरावर पुर्ण करण्यांत येवून त्यांची पुर्तता केल्यानंतरच गुणवत्ता याद्या प्रवेश नियंत्रण समितीकडे सादर करण्यांत येतील. गुणवत्ता यादी मंजूरीनंतर त्यामध्ये काही नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झालेली आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी. **(सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची तपासणी सुची संस्था स्तरावर कार्यवाहीस सोबत जोडण्यांत येत आहे)**

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २३अ) यांना माहितीकरीता मानार्थ सादर.
२) मा. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा(पूर्व) मुंबई यांना माहितीस सादर.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४४७/४२२ फॅक्स - २२६९ २१०२/२२६९ ००७

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

क्रमांकः २अ/एडीएम/गुणवत्ता यादी/२०१२/१५२७

दिनांक : 3 OCT 2012

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

विषय : संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादया पडताळणी करण्याबाबत.....

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्म.,एम.ई. पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादया आपल्या स्तरावर पडताळणी करण्यात याव्यात.

संचालनालयाने क्रमांक २अ/एडीएम/२०१२/१६२५, दिनांक २०.७.२०१२ अन्वये प्रवेशित होणा-या उमेदवारांच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत सर्व संस्थांना कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यासंदर्भाने संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीवेळी तपासणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी. आपल्या कार्यालयास देण्यात आलेल्या संकेतांक व पासवर्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने लॉगइन करून संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पडताळणी करताना तपासून घ्यावी व यादी फेरफार करणा-या संस्थांवर कडक कारवाई करून संचालनालयास तसा अहवाल दयावा.

आपल्या विभागाने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या शासनमान्य नियमावलीनुसार गुणवत्ता यादी पडताळणी करावी . **प्रवेश नियमांचे उल्लंघन करून अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश करणा-या / अपलोड करणा-या संस्थांच्या गुणवत्ता यादया पडताळणी करून संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. शासन नियमानुसार दंडात्मक कारवाईनंतर त्यांच्या गुणवत्ता यादया मंजूर करण्याबाबत पुन्हा आपल्या कार्यालयाकडे पाठविण्यात येतील तदनंतर त्या मंजूरीची शिफारस करण्यात यावी.**

आपल्या स्तरावर संस्थेची गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत आढळून आलेल्या त्रुटी गुणवत्ता यादीतील क्रमांकाचा उल्लेख करून तसे पत्र प्रवेश नियंत्रण समितीला आणि संबंधित विद्यापीठाला कळविण्यात यावे. गुणवत्ता यादी मंजूरीची शिफारस करताना त्यामध्ये केवळ जात वैधतेची त्रुटी शिल्लक आहे अशाच गुणवत्ता यादया मा.कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, बांद्रा (पूर्व) मुंबई यांच्या कार्यलयाकडे शिफारस करण्यात याव्यात. उर्वरीत त्रुटी पूर्ण करण्याच्या संस्थांना सूचना देण्यात येऊन त्यांची पूर्तता केल्यानंतरच त्या यादया प्रवेश नियंत्रण समितीकडे सादर कराव्यात.

गुणवत्ता यादी मंजूरीनंतर त्यामध्ये काही नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झालेली आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाच्या सहसंचालकांची राहिल.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

सोबत : सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची तपासणी सूची

विनाअनुदानित संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्म.,एम.ई.पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या मंजूरीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी

<u>तपासावयाची कागदपत्रे /बाबी</u>

०१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता **नवीन संस्था व अस्तित्वातील संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता बदल** याबाबत मान्यता दिलेल्या पत्राची प्रत.

०२) **नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदल** याबाबतचा शासन निर्णय

०३) सन २०१२-१३ मध्ये नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता बदल (६० पेक्षा जास्त) करण्यास परवानगी मिळाली असेल तर त्यासाठी संयुक्त खात्यात नियत ठेव जमा केल्याची पावती.

०४) संस्था सुरु होऊन दुसरे शैक्षणिक वर्ष सुरु झालेले असेल, अशा संस्थांनी अध्यक्ष/सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात दुसरा हप्ता भरल्याची पावती.

०५) संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली गुणवत्ता यादीची विभागीय कार्यालयाच्या लॉगइन द्वारे प्रिंट काढून त्यानंतरच तपासणी करण्यात यावी. **<u>कोणत्याही परिस्थितीत संकेतस्थळावरील यादीव्यतिरिक्त इतर गुणवत्ता यादी तपासण्यात येऊ नये.</u>**

०६) प्रवेशित विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमाच्या कट ऑफ डेटच्या आतच प्रवेश दिलेला आहे किंवा नाही हे तपासणे तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोडिंग विहीत मुदतीत केले आहे किंवा नाही हे तपासणे.

अभ्यासक्रमनिहाय कट ऑफ डेट व अपलोडिंगकरिता तारखा खालील तक्त्याप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

Course	Cut off date	Uploading Date
1st year B. E.	31.08.2012	05.09.2012
1st year B. Pharmacy	05.09.2012	10.09.2012
1st year B.HMCT	20.09.2012	25.09.2012
1st year B.Arch.	31.08.2012	05.09.2012
1st year MCA	31.08.2012	05.09.2012
<u>1st year MBA/MMS/PGDBM/PGDM</u>	31.08.2012	05.09.2012
<u>1st year M.Pharmacy</u>	31.08.2012	05.09.2012
1st year M. E./ M.Tech.	31.08.2012	05.09.2012
Direct Second Year Engg./Pharmacy	25.09.2012	30.09.2012

०७) **केंद्र व राज्य सरकार करिता अर्थ व सांख्यिकी माहिती (संदर्भ दि.३०.९.२०१२) भरण्याची ऑनलाईन अहवालाची प्रत**

०८) सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी **टाईप ए विद्यार्थ्यांच्या बाबतीत अधिवास प्रमाणपत्र अथवा त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (बर्थ सर्टिफिकेट) अथवा शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक** आहे

०९) संस्था स्तरावरील जागांच्या प्रवेशाकरीता वर्तमानपत्रात किमान २ जाहिराती देणे आवश्यक असतात. त्यासाठी ज्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीसाठी दिलेली असेल त्या जाहिरातीचे कात्रण व त्याअनुषंगाने तयार केलेली सर्वसाधारण गुणवत्ता यादी.

१०) संबंधित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेल्या शैक्षणिक शुल्काची प्रत.

११) अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दिनांक ०४/०७/२००८ नुसार अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र तपासणे . अल्पसंख्यांक संस्थांनी अल्पसंख्यांक कोटयात इतर उमेदवारांना प्रवेश दिले असल्यास अशा संस्थांना अल्पसंख्यांक कोटयामध्ये पुरेशा प्रमाणात उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे ते प्रवेश गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातून करण्याबाबत अल्पसंख्यांक विकास विभागाने दिलेल्या परवानगीचे पत्र सादर करणे आवश्यक आहे. असे करताना **सदर प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून भरण्यास परवानगी दिली आहे किंवा संस्थास्तरावर परवानगी दिली आहे या बाबीची काळजीपूर्वक तपासणी करावी.** अल्पसंख्यांक विकास विभागाकडे परवानगी मागितल्याच्या पत्राची प्रत अथवा परवानगी घेणार आहोत अशा आशयाचे पत्र ग्राहय धरण्यात येऊ नये.

१२) ज्या विनाअनुदानित संस्थांनी परदेशी विद्यार्थी, परदेशी नागरीक, परदेशी स्थित मूळ भारतीय नागरीक, आखाती देशांत काम करणाऱ्या भारतीय नागरीकांची मुले, एनआरआय उमेदवारांना प्रवेशक्षमतेच्या ओव्हर अँड ॲबोव्ह प्रवेश दिला असल्यास, त्याबाबतचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे परवानगीचे पत्र व महाराष्ट्र शासनाचा संबंधित शासन निर्णय.

१३) ज्या विनाअनुदानित संस्थांनी मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे प्रवेश केले असतील अशा संस्थांना या संचालनालयात शासन निर्णय क्र.एनजीसी-२००५/(८२१/०५)/मशि-३, दि.२२/०१/२००७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार दंड आकारण्यात येईल तसेच कट ऑफ डेटनंतर प्रवेश केले /अपलोडिंग केले असल्यास शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक .टीईएम-२००८/(५२/०८) तांशि-१, दि.२९/३/२००८ नुसार उशिरा प्रवेश अपलोड केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या गुणिले शिक्षण शुल्क इतका दंड आकारण्यात येईल या सूचना देण्यात याव्यात.

१४) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांकडून संचालनालयास कळविलेल्या रिक्त जागा आणि प्रत्यक्षात भरलेल्या जागा याची काळजीपूर्वक पडताळणी करावी व त्या संख्येमध्ये तफावत आढळून आल्यास त्यासंबंधी नियमानुसार कार्यवाही करावी.

१५) प्रत्येक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक पात्रतेनुसार आवश्यक निकष उमेदवाराने पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये फ्रॅक्शननुसार टक्के विचारात

घेऊन उमेदवार प्रवेशासाठी पात्र असणार आहे. उदाहरणार्थ प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी खुल्या प्रवर्गासाठी शैक्षणिक अर्हता पीसीएम मध्ये ४५टक्के व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४० टक्के आहे. उमेदवाराचे गुण फ्रॅक्शनमध्ये ४४.५०व त्यापुढे आणि मागास प्रवर्गासाठी ३९.५० व त्यापुढे असल्यास असे उमेदवार प्रवेशासाठी पात्र आहेत.

१६) पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवाराची एसएससी व एचएससी परीक्षेची मूळ गुणपत्रिका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी एसएससी , एचएससी आणि पदवी परीक्षेची मूळ गुणपत्रिका आवश्यक आहेत.

१७) शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला आवश्यक. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास उमेदवाराने सादर केलेले Affidavit आवश्यक. तसेच दूरशिक्षण / बहिस्थ विद्यार्थ्यांच्या बाबतीत ज्या केंद्रातून अभ्यासक्रम पूर्ण केला त्या केंद्राचे बोनाफाईड आणि ज्या वर्गातून शिक्षण स्थगित केले त्यावेळचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ग्राहय असेल.

१८) मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. तसेच ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांकडून दिनांक ३०.११.२०१२ पर्यंत ते सादर करण्याबाबतचे हमीपत्र

१९) एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१३ पर्यंत वैध असलेले Non-Creamy Layer Certificate

२०) महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी.

०१) आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std.XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subjects English, Physics, Chemistry and Mathematics **and** secured minimum 45% marks i.e. 135 marks out of 300 marks (minimum 40% marks i.e. 120 marks out of 300 marks in case of candidates of Backward class categories and Physically Handicapped belonging to Maharashtra state only) in the subjects Physics, Chemistry and Mathematics added together.

०२) Annexure-I मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-II मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

०३) GoI Nominee कोटयामध्ये प्रवेशित उमेदवाराच्या बाबतीत संचालनालयाचे पत्र आवश्यक.

०४) सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET किंवा AIEEE २०१३ चे स्कोअर कार्ड.

प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी.

१. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std.XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subjects English, Physics, Chemistry and Biology/Mathematics and secured minimum 45% marks i.e 135 marks out of 300 marks(40% marks i.e 120 marks out of 300 marks for backward class category candidates and Physically Handicapped belonging to Maharashtra state only) in the subjects Physics, Chemistry and Biology/Mathematics added together (Maximum of Marks Obtained in Biology/Mathematics shall be considered for the purpose of addition).

२. Annexure-I मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-II मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. GoI Nominee कोटयामध्ये प्रवेशित उमेदवाराच्या बाबतीत संचालनालयाचे पत्र आवश्यक.

४. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २०१२ चे स्कोअर कार्ड.

प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी.

१. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed the HSC (10+2 level) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subject Mathematics and secured minimum 50% marks in aggregate (45% marks in aggregate in case of f candidates of backward class categories and Physically Handicapped belonging to Maharashtra state only).

OR

Candidate should be an Indian National and should have passed the 10+3 Diploma (any stream) examination recognized by AICTE/Central/State Government or its equivalent examination and secured minimum 50% marks in aggregate (45%marks in aggregate in case of candidates of Backward class categories and Physically Handicapped belonging to Maharashtra state only)

AND

Candidate should have obtained minimum 40%marks i.e.80 marks out of 200(minimum 35%marks i.e.70 marks out of 200 in case of candidates of Backward class categories belonging to Maharashtra state only) at MAH-AR-CAT 2012

२. Annexure-I &II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. GoI Nominee कोटयामध्ये प्रवेशित उमेदवाराच्या बाबतीत संचालनालयाचे पत्र आवश्यक.

४. शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये ***सहभागी असलेल्या संस्थांमध्ये*** प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शासन CET -२०१२ चे स्कोअर कार्ड तपासणे. तसेच सदर **परीक्षा कमीत कमी ४०% गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे किंवा नाही** हे तपासणे.

५. शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये ***सहभागी नसलेल्या संस्थांमध्ये*** प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी **National Aptitude Test in Architecture (NATA) ही परीक्षा २०० पैकी किमान ८० गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे किंवा नाही** हे तपासणे.

प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी.

१. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std .XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination in Science/Home Science/Commerce/Arts/MCVC with **English** as **one of the subject** and secured minimum 45% marks in aggregate (40% marks in aggregate for backward class category candidates and Physically Handicapped belonging to Maharashtra state only) AND obtain Non Zero Score at MAH – HM – CET 2012

२. Annexure-I & II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २०१२ चे मूळ स्कोअर कार्ड.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी.

०१) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणारा विद्यार्थी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थेतून कमीत कमी तीन वर्षे कालावधीचा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम किमान ४५टक्के गुणांनी (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीयांसाठी व अपंग उमेदवारांसाठी किमान ४०टक्के गुणांनी) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

०२) विद्यार्थ्याने पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेत पूर्ण केला असेल तर तो अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदविका अभ्यासक्रमाशी समकक्ष असल्याचे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील पदविका समकक्षता प्रमाणपत्र

०३) थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशाच्या बाबतीत संस्थांनी संचालनालयास सादर केलेल्या रिक्त जागांची माहितीची प्रत आणि प्रत्यक्षात संस्थांनी दिलेल्या प्रवेशाची संख्या यांचा ताळमेळ घालून त्यानुसारच प्रवेश झालेले आहेत याची काटेकोर पडताळणी करण्यात यावी.

थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी.

१. थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणारा विद्यार्थी घेणारा विद्यार्थी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थेतून कमीत कमी तीन वर्षे कालावधीचा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम किमान ४५टक्के गुणांनी (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीयांसाठी व अपंग उमेदवारांसाठी किमान ४० टक्के गुणांनी) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेत पूर्ण केला असेल तर तो अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदविका अभ्यासक्रमाशी समकक्ष असल्याचे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील पदविका समकक्षता प्रमाणपत्र

३. थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशाच्या बाबतीत संस्थांनी संचालनालयास सादर केलेल्या रिक्त जागांची माहितीची प्रत आणि प्रत्यक्षात संस्थांनी दिलेल्या प्रवेशाची संख्या यांचा ताळमेळ घालून त्यानुसारच प्रवेश झालेले आहेत याची काटेकोर पडताळणी करण्यात यावी.

प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी.

१. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed with minimum 50% marks in aggregate (45% marks in aggregate for backward class category candidates and Physically Handicapped belonging to Maharashtra state only) in any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognized by the Association of Indian Universities **OR** any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognized by the Association of Indian Universities

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET-२०१२चे स्कोअर कार्ड तसेच जर उमेदवाराने All India CET (CAT-2011/CMAT-2012) दिलेली असल्यास त्याचे स्कोअर कार्ड आवश्यक आहे.

४. संस्थास्तरावरील प्रवेशासाठी CAT-2011/CMAT-2012/JMET/MAT/ATMA/XAT/ AMMI या पैकी कोणत्याही सीईटीचे स्कोअर कार्ड आवश्यक. तसेच जीडीपीआय दिलेले नसल्यास संस्थास्तरावर आयोजित जीडीपीआय चा स्कोअर चार्ट.

प्रथम वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी.

१. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and should have passed with minimum 50% marks in aggregate (45% marks in aggregate for backward class category candidates and Physically Handicapped belonging to Maharashtra state only) in any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognised by the **Association of Indian Universities and having studied Mathematics or Statics as one of the subject at 10+2 level or higher level examination. (**The candidates who have passed BCA, BCS, B.Sc.(COM./IT) are not required to fulfill the requirement of having studied Mathematics or Statics as one of the subject at 10+2 level or higher level examination.)

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

3. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २०१२ चे मूळ स्कोअर कार्ड. किंवा संस्थास्तरावरील प्रवेश असल्यास शासन सीईटी किंवा AMMI चे स्कोअर कार्ड

प्रथम वर्ष एम फार्मसी पदव्युत्तर पदवी.

१. तीन प्रकारात प्रवेश करण्यात येतात **१) नॉन स्पॉन्सर सीट्स-** GPAT Qualified आणि स्पॉन्सरशिप न मिळालेले उमेदवार **२) स्पॉन्सर सीट्स-** फार्मास्युटिकल्स आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले किंवा औषधनिर्माणशास्त्र पदवी / पदविका संस्थांत अधिव्याख्याता पदावर कार्यरत असलेले किंवा नोंदणीकृत अधिकृत फार्मासिस्टकडे कार्यरत असलेले व त्यांना त्या त्या आस्थापनेकडून सदर अभ्यासक्रमासाठी स्पॉन्सर केलेले आहे असे उमेदवार

(मात्र औषधनिर्माणशास्त्र पदवी मिळविल्यानंतर अर्ज करतेवेळीच्या दिनांकापर्यंत किमान २ वर्षांचा अनुभव ग्राहय धरण्यात येतो) व ३) **अजा व अज उमेदवारांकरिताच्या सीट्स** – केवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार पात्र

२. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and who possess Bachelors degree in Pharmacy or equivalent from an AICTE approved institutions , with at least 50%marks (at least 45%marks in case of SC/ST category belonging to Maharashtra State Only)

AND

Should have valid and qualified GPAT 2012 Score of Non Zero Score in MAH-MPH-CET 2012 if the candidate has neither appeared for GPAT nor having valid and qualified GPAT score.

३. प्रवेश नियमावलीत नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच प्रवेश नियावलीत नमूद केल्यानुसार संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेनुसार संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

४. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २०१२चे स्कोअर कार्ड सदर स्कोअर कार्डनुसार नॉन झिरो स्कोअर असलेला उमेदवार पात्र आहे.

५. Sponser Candidate साठी उमेदवाराचे नियुक्ती पत्र ,रुजू अहवाल,सध्याचे **अनुभवाचे प्रमाणपत्र (किमान २ वर्षाचा अनुभव अनिवार्य आहे)** स्पॉन्सर लेटर आणि अभ्यासक्रमास प्रतिनियुक्त केल्याबद्दलचे कार्यमुक्ततेचे पत्र

६. ६०टक्के जागा होम युनिव्हर्सिटी,२०टक्के जागा अदर दॅन होम युनिव्हर्सिटी व २० टक्के जागा ऑल इंडिया सीट्स म्हणून मंजूर असतात.त्यापैकी ऑल इंडिया सीट्ससाठी डोमिसाईल अथवा महाराष्ट्रात जन्म झाल्याचा दाखला सादर करण्याची आवश्यकता नाही. उर्वरीत ८० टक्के उमेदवारांकडून डोमिसाईल अथवा महाराष्ट्रात जन्म झाल्याचे प्रमाणपत्र अथवा त्याचा उल्लेख असलेला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

<u>प्रथम वर्ष एम ई/ एम टेक पदव्युत्तर पदवी.</u>

१. पुढील प्रकारात प्रवेश करण्यात येतात १) Valid GATE Qualified and Sponsored category candidates प्रवेश घेतेवेळी अभियांत्रिकी अथवा तांत्रिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या रजिष्टर फर्म/कंपनी/इंडस्ट्री/ मान्यताप्राप्त विद्यापीठाशी संलग्न शैक्षणिक किंवा संशोधन संस्थेतील **किमान २ वर्षांचा अनुभव** ग्राहय धरण्यात येतो (तसेच संस्थास्तरावर घेण्यात येणा-या ७० मार्कांची लेखी परीक्षा आणि ३० मार्कांची मुलाखत यामध्ये किमान ४० गुण आवश्यक असतात) जर असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर २) Valid GATE Qualified Non Sponsored category candidates मधून प्रवेश करण्यास परवानगी आहे. ३) Non GATE and Non Sponsored category candidates

२. आवश्यक प्रवेश पात्रता

Candidate should be an Indian National and who possess Bachelors degree or equivalent in the relevant field of Engineering / Technology, specified by the concered University for admission to a particular Post graduate course from an AICTE approved institutions , with at least 50%marks (at least 45%marks in case of SC/ST category belonging to Maharashtra State Only)

AND

Candidate must have minimum of 2 years of full time work experience in a registered firm/ company/ industry/educational and/or research institute/any Government Deapartment or Government Autonomous Organization in the relevant field in which admission is being sought.

१. प्रवेश नियमावलीत नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच प्रवेश नियावलीत नमूद केल्यानुसार संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेनुसार संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

२. Sponser Candidate साठी उमेदवाराचे नियुक्ती पत्र ,रुजू अहवाल,सध्याचे **अनुभवाचे प्रमाणपत्र (किमान २ वर्षाचा अनुभव अनिवार्य आहे)** स्पॉन्सर लेटर आणि अभ्यासक्रमास प्रतिनियुक्त केल्याबदलचे कार्यमुक्ततेचे पत्र